# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 10/05/2023 (बुधवार) सायंकाळ

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. भिवापूर** :– दिनांक १५/१०/२०१७ चे ०१/०७ वा. दरम्यान फिर्यादी नामे– अंकुश उर्फ अंगराज श्रीधर सुर्यवंशी वय ३० वर्ष रा. नांहगाव तर्फे नापोशि नरेंद्र पटले ब.नं. १२२२ पो.स्टे. भिवापूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे अप क्र. ९/१९ कलम ३०२, ३०७ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील मृतक नामे– वामन कारूजी पाटिल, वय २५ वर्ष व आरोपी नामे– विशाल तुकडु मेश्राम, वय ३० वर्ष रा. भिवापुर यांचा खर्रा देण्याचे कारणा वरून वाद झाले. यातील आरोपीने मृतक यास हातबुक्कीने मारपीट करून डोक्यावर काठीने मारून गंभीर जखमी केले. जखमी हा उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक संतोष वैरागडे पो.स्टे. भिवापुर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १०/०५/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश पावसकर सा. यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ३०४ भादवि. मध्ये ७ वर्ष सश्रम कारावास व १०, ०००/– रू. दंड, दंड न भरल्यास २ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ./८३१ तुलाराम खडसे पो.स्टे. भिवापूर यांनी मदत केली आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. कन्हान** :– दिनांक ०९/०५/२०२३ चे १२/०० वा. ते १२/३० वाजता दरम्यान फिर्यादी तिची अल्पवयीन मुलगी वय १४ वर्ष ही नेहमी प्रमाणे तिच्या सायकलने कन्हान येथुन टयुशन वरुन घरी परत येत असता गोडेगाव रोड येसंबा शिवारात वाघोली टि पाईट जवळ समोरुन येसंबा गावाकडुन येणाऱ्या रोडने एक अज्ञात इसम वय अंदाजे २१ वर्ष त्याच्या अंगावर पिवळया रंगाची फुल बाहयाची टि शर्ट व काळया रंगाचा फॉर्मल पॅन्ट घातलेला तसेच डोक्यावर पांढऱ्या रंगाचा रुमाल बांधलेला असुन तोंडावर मास्क लावलेला इसम हा त्याच्या लाल काळया रंगाच्या स्प्लेंडर गाडीने फिर्यादीच्या मुलीच्या जवळ येवुन तिची सायकल थांबवुन त्याने त्याची गाडी थांबविली आणि फिर्यादीच्या मुलीच्या खांदयावर हात टाकुन तिला खाली दाबले व उभे केले आणि फिर्यादीच्या मुलीच्या गालावर थापड मारली व सदर अज्ञात इसमाने त्याच्या तोंडावरुन मास्क काढुन फिर्यादीच्या मुलीची मान पकडुन म्हणाला की "मुझे किस दो" असे म्हटले असता फिर्यादीची मुलगी हिने आरडा ओरडा केला असता तेथील आजुबाजुच्या शेतातील लोक धावुन आले असता सदर लोकांना त्याच्यांकडे येतांना पाहुन अज्ञात इसम त्याच्या वाहनाने तेथुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३५४ ३५४ अ, ३२३ भादवि. सहकलम १२ बालकांचे लैगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सिमा बेन्द्रे मॅडम पोस्टे कन्हान मो. क्र. ७५८८७१७९०१ या करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. खापरखेडा :** – दिनांक ०८/०५/२०२३ चे रात्री २३/०० वाजता ते ०९/०५/२०२३ चे सकाळी ०६/०० वाजता दरम्यान पो.स्टे. खापरखेडा हद्यीत फिर्यादीची अल्पवयीन भाची वय १४ वर्षे ही उन्हाळयाच्या सुट्टयांमध्ये त्यांच्या घरी राहण्यास आली होती. फिर्यादीची अल्पवयीन भाची ही कोणालाही न सांगता परस्पर त्यांचे राहते घर सोडून निघून गेली कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे.

मुलीचे वर्णन– रंग गेहुआ, उंची ५ फुट ५ इंच बांधा मध्यम, चेहरा गोल, अंगात लाल रंगाची टीशर्ट नीळया रंगाचा जीन्स घातलेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पीसे मो. नं. ९८८१३७७३४८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड :**– दिनांक ०८/०५/२०२३ चे १०/०० वा. ते १८/३० वा. दरम्यान पो.स्टे. उमरेड हद्यीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ही दि. ०८/०५/२०२३ रोजी सकाळी १०/०० वाजता एम. एस. सी. आय. टी क्लास करिता आईला सायंकाळी ०५/०० वा. पावेतो घरी येईल माझे पेपर आहे असे सांगुन गेली ०६/३० वा. फिर्यादीचे पत्नीने फोन करुन सांगीतले कि फिर्यादीची मुलगी ही एम. एस. सी. आय. टी. क्लास मधुन अजुन पावेतो घरी आली नाही तिचे मैत्रीण तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन न आल्याने तिचे मोबाईलवर फोन लावला असता फोन उचलत नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे.

वर्णन– उंची ०४ फुट बांधा सडपातळ रंग सावळा केस आखुड भूरकट रंगाचे, अंगात ब्लु रंगाचा जिन्स व पाढरा कुर्ता कथ्या रंगाचा स्कुल बॅग व रियलमी कंपनीचा मोबाईल.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि रविन्द्र नामदेवराव वाघ मो क्र ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**